पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ७

**सभावृत्तांत**

दिनांक - **११/०७/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **११/०७/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सागर बाळासाहेब गवळी - सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
४. मा.संतोष बबन कांबळे

या शिवाय मा.कडूसकर – सहा.आयुक्त, मा.इंदलकर - नगरसचिव, मा.पुजारी – कार्यकारी अभियंता, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.२) मौजे दापोडी येथील आ.क्र.३/१४ इंजिनिअरींग स्टोअर्स (ES) या आरक्षित जागेवर म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार उंच पाण्याची टाकी (ESR) साठी होणा-या बदलास मान्यता देणेबाबत – मा.शशिकांत कदम, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **२७/०६/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ६)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - १० विषय क्रमांक - ०१

दिनांक - ११/०७/२०१७ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.विकास डोळस अनुमोदक : मा.संतोष कांबळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१३/५४/२०१५, दि.११/०५/२०१५

विषय – पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व स.नं.१४ पै. मधील २४ व १२ मी.रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे भूसंपादनाबाबत...

विषय क्रमांक ०१ चा विचार दिनांक २२/०८/२०१७ च्या सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक - ११ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ११/०७/२०१७

सुचक : मा.शशिकांत कदम अनुमोदक : मा.विकास डोळस

संदर्भ : मा.शशिकांत कदम, मा.विकास डोळस यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील मौजे दापोडी येथील आ.क्र. ३/१४ इंजिनिअरींग स्टोअर्स (ES) या आरक्षित जागेवर पाण्याची टाकी (ESR) साठी होणा-या बदलास म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. मौजे दापोडी येथे सद्यस्थितीत आ.क्र.३/३ उंच पाण्याची टाकीसाठी ४००० चौ.मी. क्षेत्र आरक्षित केलेले आहे. या ठिकाणी एकच पाण्याची टाकी बांधण्यात आलेली आहे. त्याठिकाणी दुसरी पाण्याची टाकी बांधणे शक्य होणार नाही. दापोडी येथील लोकसंख्या पाहता एकच पाण्याची टाकी असल्यामुळे पाण्याची खुपच टंचाई निर्माण झालेली आहे. त्यामुळे दुस-या पाण्याच्या टाकीसाठी नियोजन करणे गरजेचे आहे. दापोडी येथील स.नं.१३ पैकी आ.क्र.३/१४ इंजिनिअरींग स्टोअर्ससाठी आरक्षित असलेली १००० चौ.मी. जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. मौजे दापोडी येथील आ.क्र.३/१४ इंजिनिअरींग स्टोअर्स या आरक्षित जागेवर म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार उंच पाण्याची टाकी (ESR) साठी आरक्षण फेरबदल प्रस्तावित करणेस मान्यता देणेस व सदर म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार आरक्षण फेर बदलाची संपुर्ण कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहीर नोटीस करणेकामीचे, हरकती व सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सागर बाळासाहेब गवळी )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९५९/२०१७
दिनांक : १४/०७/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2017 sub committee sabhapati.doc